ठाणे, शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४४ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**अति ताणाचे बळी**

सध्याचे जग धावपळीचे झाले आहे. चार पैसे कमावण्याच्या नादात किंवा काम कमी कालावधीत जास्त काम केल्यामुळे अनेक कंपन्यांमधील कर्मचारी विमनस्क अवस्थेत जगत असतात.. .......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३१° से | किमान २६° से

**बाजार**

सोने ७४,४५० | चांदी ९१,000

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




मुलगा व्हॉट्स अपवर ग्रुप ॲडमिन आहे, हेच चिंतेचे कारण आहे, डॉक्टर साहेब........

## केंद्र सरकारला मोठा दणका | मुंबई हायकोर्टाने सुधारित आयटी नियम घटनाबाह्य ठरवले

**मुंबई –ऑनलाईन आणि सोशल मीडियावर केंद्र सरकारच्या कामकाजाशी संबंधित मजकुरांवर देखरेख ठेवून कथितरित्या असत्य, चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या व मजकूर हटवणे सक्तीचे करण्याचे अधिकार सरकारला देणारे सुधारीत आयटी नियम मुंबई हायकोर्टाने घटनाबाह्य ठरवले आहे. यापूर्वी याप्रश्नी सुनावणी घेणाऱ्या खंडपीठामधील न्यायमूर्ती गौतम पटेल व न्यायमूर्ती नीला गोखले यांच्यामध्ये निर्णय देताना मतभिन्नता झाल्याने तिसऱ्या न्यायमूर्तींच्या विचारार्थ हा विषय पाठवण्यात आला होता. त्यानुसार न्यायमूर्ती अतुल चांदुरकर यांनी आज आपला निर्णय जाहीर केला. सुधारित आयटी नियम घटनाबाह्य व बेकायदा असल्याचा निर्णय त्यांनी दिल्याने आता हा निर्णय बहुमताचा झाला आहे.**

### केंद्र सरकारचा कोणता नियम होता ?

माहिती-तंत्रज्ञान कायद्यांतर्गतच्या (आयटी) नियमांमध्ये केंद्र सरकारने ६ एप्रिल २०२३ रोजी दुरुस्ती आणून नवे नियम अंतर्भूत केले होते. 'सुधारित नियमांप्रमाणे सरकारविरोधातील संबंधित कोणताही ऑनलाईन मजकूर हा खोटा किंवा चुकीचा किंवा दिशाभूल करणारा आहे का, हे तपासण्यासाठी सत्यशोधक कक्ष निर्माण करण्याची तरतूद केली आहे. त्या कक्षाने विशिष्ट मजकूर हटवण्यास किंवा त्यात दुरुस्ती करण्यास सांगितले, तर सोशल मीडिया चालवणाऱ्या कंपन्यांना तसे करावे लागणार आहे. तसे न केल्यास आयटी कायद्याच्या कलम ७९ अन्वये असलेल्या संरक्षणापासून त्यांना मुकावे लागणार आहे. म्हणजे च सरकारची मनमानी चालणार आहे.



या नियमांच्या आधारे सरकारविरोधात काहीही म्हटले तर ते खरे की खोटे, बरोबर की चूक हे सरकार स्वत:च ठरवणार आहे. म्हणजे केंद्र सरकार स्वत:च एकप्रकारे न्यायाधीशाच्या व खटला चालवणाऱ्याच्याही भूमिकेत राहणार आहे. अशा वादांबाबत सुनावणी किंवा अपीलची तरतूदही सरकारने नियमांत केलेली नाही. म्हणजे या नियमांत नैसर्गिक न्यायतत्त्वालाही तिलांजली देण्यात आली आहे. सुधारीत नियम हे नागरिकांच्या भाषा व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहेत', असे निदर्शनास आणत स्टँडअप हास्यकलाकार कुणाल कामरा यांनी याचिका केली होती. त्याचबरोबर एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया (ईजीआय), असोसिएशन ऑफ इंडियन मॅगझीन्स यांनीही याचिका केल्या होत्या. तर दूरचित्रवाहिन्या व डिजिटल मीडियाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'न्यू ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल असोसिएशन'ने अर्ज केला होता. याविषयीच्या अंतिम सुनावणीअंती न्या. गौतम पटेल व न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने यावर्षी ३१ जानेवारी रोजी निर्णय दिला. मात्र, दोघांमध्ये मतभिन्नता झाल्याने तो निर्णय विभाजित ठरला होता. परिणामी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय यांनी हा विषय न्या. चांदुरकर यांच्यासमोर कायदेशीर अभिप्रायार्थ वर्ग केला होता. याचिकाकर्त्यांनी न्या. चांदुरकर यांना अंतिम निर्णय होईपर्यंत सुधारित नियमांच्या अधिसूचनेला स्थगिती देण्याची विनंती केली होती. मात्र, न्या. चांदुरकर यांनी ती फेटाळली होती. त्यानंतर याचिकाकर्त्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली. सुप्रीम कोर्टाने अधिसूचनेला स्थगिती देत दिलासा दिला होता. त्या पार्श्वभूमीवर, आज, शुक्रवारी न्या. चांदुरकर यांचा अंतिम निर्णय आला. त्यांनी आता हा विषय पुन्हा दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे वर्ग केला आहे. त्या खंडपीठाकडून अंतिम निर्णय जाहीर करण्याची औपचारिकता होईल.

## मुंबईपासून दुरावलेल्या लाखो लोकांना हक्काचे घर देऊन पुन्हा मुंबईत आणू

■ जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या टप्प्यात शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची ग्वाही

(सविस्तर वृत्त पान २)



## 'पीएम विश्वकर्मा' योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा - मोदी

**वर्धा : पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती–जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृध्दीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याचीही ग्वाही प्रधानमंत्र्यांनी येथे दिली.**



*आज उद्घाटन झालेल्या दोन्ही योजना राज्यासाठी महत्वाच्या असून 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजने'च्या माध्यमातून राज्यातील ३ लाख युवकांना कौशल्य विकास करण्यासाठी मार्गदर्शन मिळणार आहे तर 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजने'च्या माध्यमातून नारीशक्तीला बळ मिळणार असून नवीन स्टार्ट अप्सना २५ लाखांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. तसेच अमरावती येथे ५ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून सुरू होणाऱ्या 'नमो मित्रा टेक्स्टाईल पार्क'च्या माध्यमातून २ लाखाहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहेत.*

*– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे*





पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते.

अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई–भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमात एक लाख विश्वकर्मा (पान २ वर)

## थोडक्यात घडामोडी

### मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते उद्या होणार कोळी भवना चे भूमिपूजन

कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. आमदार रमेशदादा पाटील यांच्या संकल्पनेतून ऐरोली, नवी मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या कोळी भवन या नवीन वास्तूचा भूमिपूजन समारंभ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते तसेच इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २२/०९/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वा. ऐरोली, नवी मुंबई येथे संपन्न होणार आहे.

याबाबत माहिती देताना मा. आमदार रमेशदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नोकरी, शिक्षण, हॉस्पिटल अशा विविध कामानिमित्त मुंबई शहरात येणाऱ्या सर्वसामान्य आदिवासी कोळी व मच्छीमार बांधवांकरिता आणि विविध स्पर्धांच्या तयारी करीता ग्रामीण भागातून येणाऱ्या कोळी समाजातील युवक–युवतींना राहण्याची सोय व्हावी. त्याचप्रमाणे नवी मुंबईतील भूमिपुत्र–प्रकल्पग्रस्त, कोळी–आगरी बांधवांच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांकरिता कोळी महासंघाच्या माध्यमातून रु. २० कोटी खर्च करून नवी मुंबई येथे भव्य असे कोळी भवन उभारण्यात येत आहे. तसेच या नवीन वास्तूचा भूमिपूजन समारंभ राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असल्याचे सांगितले. तसेच या सुवर्णक्षणाचे साक्षीदार होण्याकरीता राज्यातील सर्व आदिवासी कोळी व मच्छीमार बांधवांनी आणि नवी मुंबईतील भूमिपुत्र–प्रकल्पग्रस्त, कोळी–आगरी बांधवांनी हजारोंच्या संख्येने ऐरोली, नवी मुंबई येथे उपस्थित रहावे असे सर्व समाज बांधवांना आवाहन केले.

## ठाण्यातील केबीपी महाविद्यालयात कौशल्य विकासाचे धडे!





**ठाणे – गरजू विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे पारंपरिक पद्धतीबरोबरच आधुनिक पद्धतीचे शिक्षण मिळण्यासाठी महत्वाचे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ठाण्यातील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) महाविद्यालयातही सुरू झाले आहे. भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते या केंद्राचे आज उद्घाटन करण्यात आले.**

■ भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते उद्घाटन



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील राज्यातील १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू झाले. या महाविद्यालयांमध्ये ठाण्यातील वागळे इस्टेटमधील केबीपी महाविद्यालयाचा समावेश करण्यात आला आहे. या केंद्रांमधून कौशल्य विकास कोर्सेसचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आमदार निरंजन डावखरे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन, भविष्यातील प्रगतीसाठी कौशल्य विकासाचे (पान २ वर)

## आज मध्य रेल्वेवरील ठाणे स्थानकावर पादचारी पुलाची तुळई उभारण्यासाठी वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार

मुंबई : मध्य रेल्वेवरील ठाणे स्थानकावर पादचारी पुलाची तुळई उभारण्यासाठी वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. शनिवारी रात्री १०.३० ते पहाटे ४.३० वाजेपर्यंत सहा तासांचा ट्रान्स हार्बर मार्ग आणि सहाव्या मार्गिकेवर ब्लॉक असेल. त्यामुळे लोकल वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

ट्रान्सहार्बर मार्गावरील कोपर खैरणे ते ठाणे अप आणि डाऊन आणि मुख्य मार्गिकेच्या दिवा ते मुलुंड सहाव्या मार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत पुलाची तुळई उभारण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे सहाव्या मार्गावरील चालवण्यात येणाऱ्या रेल्वेगाड्या कल्याण / दिवा ते मुलुंड / विद्याविहार स्थानकादरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत. तर, शनिवारी रात्री १०.०१ ते मध्यरात्री १२.०५ दरम्यान ठाणे ते वाशी / पनवेल लोकल, रात्री ९.३७ पासून वाशी ते ठाणे आणि रात्री ११.१८ पर्यंत पनवेल ते ठाणे लोकल रद्द करण्यात येणार आहेत.

डाऊन ट्रान्सहार्बर मार्गावरील ब्लॉकपूर्वीची शेवटची लोकल ठाणे येथून रात्री ९.४१ वाजता सुटेल आणि वाशी येथे रात्री १०.१० वाजता पोहोचेल. अप ट्रान्सहार्बर (पान २ वर)



### घोडबंदर रोड वाहतूक कोंडीमुक्त राहण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा सातत्याने घेतला जातोय आढावा

## ठाण्यात विरुद्ध दिशेकडील वाहतुक रोखण्यासाठी 'टायर किलर'

**ठाणे – गेल्या पंधरा दिवसात घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यात बऱ्यापैकी यश मिळाले आहे. वाहतूक कोंडीपासून मुक्तीसाठी करीत असलेल्या या उपाययोजनांचा सातत्याने आढावा घेतला जात असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे. घोडबंदर रोड तसेच अंतर्गत रस्ते यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी सहा सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर आज, शुक्रवारी पुन्हा एकदा उपाययोजना तसेच अडचणी याचा विचार करण्यासाठी बैठकीचे आयोजन महापालिकेच्या नागरी प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले होते.**

या बैठकीस ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, उपायुक्त दिनेश तायडे आणि शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विकास ढोले आणि शुभांगी केसवानी, घोडबंदर रोडचे नोडल ऑफिसर आणि कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

### उलट्या दिशेची वाहतूक रोखण्यासाठी ठाण्यातही होणार 'टायर किलर'चा प्रयोग

रस्त्यावर विरुद्ध दिशेने वाहने चालवण्याच्या प्रकारांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाण्यात प्रायोगिक तत्त्वावर 'टायर किलर' बसवण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. अशी ठिकाणे वाहतूक पोलीस निश्चित करणार आहेत. त्यानंतर तेथे महापालिकेतर्फे 'टायर किलर' बसवण्यात येतील. हे 'टायर किलर' बसवण्यापूर्वी त्याची सविस्तर माहिती त्या त्या भागात दिली जाईल. अशा प्रकारचे 'टायर किलर' असल्याची माहिती देणारे बोर्ड १०० ते २०० मीटर आधीपासून लावण्यात येतील. या भागात रात्रीच्या वेळेस पुरेसा प्रकाश असल्याची खात्री केली जाईल. तसेच सीसीटीव्ही कॅमेरा क्षेत्रात तो भाग येत असल्याचे निश्चित केल्यानंतर मग हे 'टायर किलर' बसवले जातील. त्यांच्यामुळे विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना अटकाव होईल, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.



घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या समस्येची तड लावण्यासाठी झालेल्या पहिल्या बैठकीमध्ये ठरवण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार विविध यंत्रणांनी एकमेकाशी समन्वय राखून उपाययोजना केल्याची आल्याची माहिती पंकज शिरसाट यांनी या बैठकीत दिली. तसेच, सध्या असलेल्या अडचणी व त्यावरील संभाव्य तोडगे यांचे विवेचनही त्यांनी केले. त्याचबरोबर, १२.५ टन क्षमतेच्या पुढील वाहने ही अवजड वाहने आहेत. त्यात सरसकट सर्व मालवाहू वाहने येत नाहीत. त्यामुळे तशी काही मालवाहू वाहने दिसली तर गैरसमज होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. गायमुख घाट, भाईंदर पाडा ते गायमुख या पट्ट्यामध्ये अजूनही वाहतुकीसंदर्भात काही उपाययोजना करण्याची गरज शिरसाट यांनी व्यक्त केली.

दीडशे ते दोनशे टनाच्या गाड्या गायमुख घाटातून जातात त्यामुळे पावसाळ्यात डांबरी रस्ता सतत खराब होतो. त्यामुळे येथे काँक्रिटीकरणाची आवश्यकता असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधीक्षक अभियंता यांनी दिली. हा मार्ग आता मिरा–भाईंदर (पान २ वर)

## ठाण्यातील केबीपी महाविद्यालयात कौशल्य विकासाचे धडे!

**(पान १ वरून)** धडे घेण्याचे आवाहन केले. आदर्श विकास मंडळाचे अध्यक्ष सचिन मोरे व प्राचार्य संतोष गावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. केबीपी महाविद्यालयातील केंद्रात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी, अकाऊंट असिस्टंट, डिजिटल मिडिया मॅनेजमेन्ट, वेब डेव्हलपमेंट आणि इतर अनेक कोर्सेस उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. या वेळी महाविद्यालयातील शिक्षक व २०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

## आज मध्य रेल्वेवरील ... ब्लॉक घेण्यात येणार

**(पान १ वरून)** मार्गावरील ब्लॉकपूर्वीची शेवटची लोकल वाशी येथून रात्री ९.२४ वाजता सुटेल आणि ठाणे येथे ९.५३ वाजता पोहोचेल. डाऊन ट्रान्सहार्बर मार्गावरील ब्लॉकनंतर पहिली लोकल ठाणे येथून पहाटे ५.१२ वाजता सुटेल आणि पनवेल येथे सकाळी ६.०४ वाजता पोहोचेल. अप ट्रान्सहार्बर मार्गावरील ब्लॉकनंतर पहिली लोकल वाशी येथून सकाळी ६.३० वाजता सुटेल आणि ठाणे येथे सकाळी ६.५९ वाजता पोहोचेल, अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली.

## ठाण्यात विरुद्ध दिशेकडील वाहतूक रोखण्यासाठी 'टायर किलर'

**(पान १ वरून)** महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर, कापूरबावडी- माजीवडा उड्डाणपुलावरील मुंबईच्या दिशेने असलेल्या यु टर्न ते विवियाना मॉलपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण लवकरच केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मेट्रोलगत सुरू असलेल्या दोन उड्डाणपुलांच्या कामामुळे तेथील मार्गिका छोट्या झाल्या असल्याने सेवा रस्ते अधिक सक्षम करावे, अशी मागणी मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यावर सेवा रस्त्यावरून अवजड वाहतूक करताना अधिक खबरदारी घेण्याची आवश्यकता नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी व्यक्त केली. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आधी सेवा रस्त्याचे सक्षमीकरण करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

सर्व रस्ते खड्डेमुक्त, समान पातळीचे असतील. त्यावर कुठेही उंचवटे तयार होणार नाहीत, याची खात्री सर्व यंत्रणांनी करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. त्याचबरोबर, सेवा रस्ते फेरीवाला मुक्त करणे, पार्किंग हटवणे आणि ओव्हरहेड वायरचा बंदोबस्त करणे ही कामे महापालिका यंत्रणा तत्काळ करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## 'पीएम विश्वकर्मा' योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**(पान १ वरून)** प्रशिक्षणार्थ्यांना डिजिटली प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच विश्वकर्मा योजनेअंतर्गत ७५ हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्रींच्या हस्ते डिजिटल कर्ज वितरित करण्यात आले. तसेच विश्वकर्मा योजनेअंतर्गत देशातील १८ कारागिरांना पंतप्रधानांच्या हस्ते प्रत्येकी एक लाख रुपयांच्या कर्जाचा धनादेश प्रदान करण्यात आला. तसेच प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या विशेष टपाल तिकिटाचे अनावरण देखील यावेळी करण्यात आले.

आजच्याच दिवशी १९३२ मध्ये महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनसाठी सुरू केलेल्या अभियानाची आठवण करुन देतानाच बापूजींची कर्मभूमी आणि विनोबांची साधनाभूमी असलेल्या वर्ध्यातून विकसित भारताची निर्मिती करण्याच्या आमच्या संकल्पास ऊर्जा मिळते, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीच्या सोहळ्यासाठी आम्ही यामुळेच वर्ध्याची निवड केली. ही योजना केवळ एक सरकारी कार्यक्रम नसून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात हजारो वर्षांपासून असलेल्या कौशल्याचा वापर करण्याचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. इतिहासात आपल्या देशातील समृध्दीचा मोठा आधार पारंपरिक कौशल्य हाच होता. येथील वस्त्रोद्योग, शिल्पकला, धातूविज्ञान, अभियांत्रिकी अशा साऱ्याच बाबी जगात वैशिष्टपूर्ण होत्या. जगातील सर्वात मोठा वस्त्रनिर्माता भारतच होता. मात्र पारतंत्र्याच्या कालखंडात इंग्रजांनी स्वदेशी कौशल्य नष्ट केले. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी वर्ध्यातूनच ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात बलुतेदारी समुहाची सातत्याने उपेक्षा झाली. त्यामुळेच प्रगती आणि आधुनिकतेत देशाची पिछेहाट झाल्याची खंत प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

कारागिरांच्या पारंपरिक कौशल्याचा सन्मान, सामर्थ्य आणि या समाजसमूहाची समृध्दी ही या योजनेमागची मूळ भूमिका असल्याचे स्पष्ट करुन मोदी म्हणाले, देशातील सातशेहून अधिक जिल्हे, अडीच लाखांहून अधिक ग्रामपंचायती तसेच हजारो स्थानिक नागरी संस्था या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहेत. दहा लाखांहून अधिक लोक या योजनेशी जोडले गेले असून आठ लाख शिल्पकारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यात केवळ महाराष्ट्रातीलच साठ हजारांहून कारागिर समाविष्ट आहेत. त्यांच्या कामाला आधुनिक आणि डिजिटल तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. साडेसहा लाख बलुतेदारांना आधुनिक साधने दिली गेली आहेत. या योजनेचा सर्वाधिक फायदा याच समाजसमूहांना होत आहे. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात मोठ्या औद्योगिक विकासाची क्षमता असून त्यात वस्त्रोद्योग हा अग्रणी आहे. विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असुनही येथील शेतकऱ्यांची यापूर्वी उपेक्षा झाल्याची खंत व्यक्त करुन प्रधानमंत्री मोदी म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर नांदगाव खंडेश्वर येथे टेक्सटाइल पार्कची निर्मिती झाली. आता अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून आमचे प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल. औद्योगिक विकासासाठी पुरक असणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विदर्भातील सिंचन विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा योजनेच्या अंमलबजावणीतून १० लाख एकर क्षेत्र सिंचित होणार आहे. याशिवाय कांदा, सोयाबीन उत्पादकांनाही विविध निर्णयाच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे, असे प्रधानमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.


### परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका

**ई- निविदा सुचना - मुदतवाढ २**

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेकडील बसेसकरीता आवश्यक बॉशपंप व इंजेक्टर दुरुस्ती मायकोचे अधिकृत सर्व्हिस स्टेशन यांचेकडुन कामे करणेकामी एक वर्ष कालावधीकरिता कामी दोन लिफाफा पध्दतीने ठामपा/पिआरओ/परिवहन/४०९/२४-२५ दि.०२.०९.२०२४ व ठामपा/पिआरओ/परिवहन/ ४८१/२४-२५ दि. १२.०९.२०२४ नुसार शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेस दि.२७/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून सदरच्या निविदा दि. २७/ ०९/ २०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. व शक्य झाल्यास दि.३०/ ०९ /२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/५२९/२०२४-२५ — सही/-
दि.२०.९.२०२४ — परिवहन व्यवस्थापक
**PLS VISIT OUR OFF. WEBSITE** — परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
**www.thanecity.gov.in**


## मुंबईपासून दुरावलेल्या लाखो लोकांना हक्काचे घर देऊन पुन्हा मुंबईत आणू

### शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची ग्वाही

मुंबई - रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील अडचणी दूर झाल्याने घरांचा प्रश्न मार्गी लागेल आणि मुंबईपासून दुरावलेल्या लाखो लोकांना हक्काचे घर देऊन पुन्हा मुंबईत आणू , अशी ग्वाही शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली. जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या टप्प्यात खासदार डॉ. शिंदे यांनी आज उत्तर-पश्चिम आणि उत्तर मुंबईमधील विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला.यावेळी पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



खासदार डॉ. शिंदे पुढे म्हणाले की, मागाठाणेमध्ये घरांचा प्रश्न मोठा असून येथे 'एमएमआरडीए' आणि 'एसआरए'ने एकत्रपणे योजना सुरु केली आहे. तसेच एमएमआरडीए आणि एसआरए यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टीचे पुनर्वसन केले जाणार आहे. मागील काही वर्षात एसआरएमध्ये भ्रष्टाचार झाला, काहीजण तुरुंगात आहेत तर अनेक बिल्डर फरार आहेत. यामुळे लोकांना त्यांची हक्काची घरे मिळाली नाहीत. या प्रकल्पांची जबाबदारी सरकारने घेतली असून लाखो मुंबईकरांना हक्काचे घर मिळवून देऊ. आतापर्यंत सरकारने २२७ एसआरए प्रकल्प मार्गी लावले आहेत. मराठी माणसाला मुंबईत परत आणण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. गेली अनेक वर्षे ज्यांनी मुंबईत सत्ता गाजवली त्यांनी मात्र मुंबईकरांसाठी काहीच केले नाही, अशी टीका खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठावर केली.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने शिवसेनेची सध्या राज्यभर जनसंवाद यात्रा सुरु आहे. पक्ष संघटन वाढवण्याच्या दृष्टीने त्र्कार्यकर्ते, पदाधिकारी, शाखाप्रमुखांशी चर्चा करणे तसेच सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचल्या का, याचाही यात आढावा घेण्यात येत आहे. शिवसेना घोडदौड करत असून विधानसभेत जास्तीत जागा निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**मविआत सर्वांनाच मुख्यमंत्री बनायचंय**- काही लोकं मला मुख्यमंत्री करा, असं बोलत फिरत असल्याचा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठाचे नाव न घेता लगावला. त्यांना रोज खोक्यांशिवाय काही दिसत नाही. ज्या काँग्रेसच्या विरोधात बाळासाहेब ठाकरे आयुष्यभर लढले त्यांच काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून तुम्ही बसलात अशी टीकाही त्यांनी उबाठावर केली. महाविकास आघाडीमध्ये सर्वांनाच मुख्यमंत्री बनायचे आहे. रोज नशा करुन बोलणाऱ्यांना उत्तर देण्याची गरज नाही, या भाषेत खासदार डॉ. शिंदे यांनी संजय राऊत यांचा समाचार घेतला.


### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग
प्रथम मुदतवाढ

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकमाकरीता टी.बी. रुग्णांच्या तपासणीकरीता लागणारे प्रयोगशाळा साहित्य पुरवठा करणेसाठी ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने ठामपा/पिआरओ/आरोग्या/४५१/२०२४-२५, दि.०६-०९-२०२४ अन्वये निविदा मागविण्यात आलेली होती. सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने निविदस प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.१९/०९/२०२४ ते २३/०९/२०२४ पर्यंत संध्याकाळी १६:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.२३/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १६:३० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि. २४/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १६:०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/५३४/२०२४-२५ — सही/-
दि:२०.०९.२०२४ — उपआयुक्त (आरोग्य)
**Pls visit our oficial web-site** — ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**



### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय/ राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय,**
**कंत्राटी पध्दतीने पदभरतीची जाहिरात**

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर १७९ दिवसाच्या कालावधीसाठी भरती करावयाची आहे. त्यासाठी सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी पात्र व इच्छूक उमेदवारांनी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृह, स्थायी समिती सभागृह, तिसरा मजला, प्रशासकीय भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी पाचपाखाडी, ठाणे येथे खालील पदासाठी त्या-त्या संवर्गाच्या समोर दर्शविलेल्या दिनांकास सकाळी ११:०० ते दुपारी ०२:०० या वेळेत थेट मुलाखतीस (Walk In Interview) उपस्थित रहावे. उमेदवारांनी सर्व कागदपत्र/ प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी दोन प्रतींमध्ये स्वयंसाक्षांकित/ प्रमाणित करुन सादर करावीत. जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता धारण करत नसलेले उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम व पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | प्रतिमाह मानधन | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | **शस्त्रक्रिया सहाय्यक** (ओ.टी.असिस्टंट)<br>अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा-अ ०१<br>भज-क ०१<br>इमाव ०३<br>आ.दु.घ. ०१<br>खुला ०६<br>**एकूण १५** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेतील जीवशास्त्र विषयासह उत्तीर्ण.<br>२) शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील ओ.टी.टेक्नॉलॉजी मधील पदविका आवश्यक.<br>३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची ओ.टी.टेक्नॉलॉजी मधली पदवी असल्यास, प्राधान्य.<br>४) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेच्या हॉस्पीटलकडील शस्त्रक्रिया सहायक अथवा समकक्ष कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.२६/०९/२०२४ |
| २ | **न्हावी**<br>अनु.जाती ०१<br>खुला ०१<br>**एकूण ०२** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेकडील न्हावी (बार्बर) अथवा समकक्ष कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.२६/०९/२०२४ |
| ३ | **ड्रेसर**<br>अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजा-अ ०१<br>इमाव ०२<br>आ.दु.घ. ०१<br>खुला ०४<br>**एकूण १०** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील ड्रेसर अभ्यासक्रम पूर्ण व तद्नंतर एन.सी.टी.व्ही.टी.चे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेच्या हॉस्पीटलकडील ड्रेसर या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.२६/०९/२०२४ |
| ४ | **वॉर्डबॉय**<br>अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा-अ ०१<br>इमाव ०२<br>आ.दु.घ. ०१<br>खुला ०४<br>**एकूण ११** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) शासनमान्य संस्थेकडील रुग्ण सहायक प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्य.<br>३) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेच्या हॉस्पीटलकडील वॉर्डबॉय या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.३०/०९/२०२४ |
| ५ | **दवाखाना आया**<br>अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा-अ ०१<br>भज- ब ०१<br>भज- क ०१<br>इमाव ०३<br>आ.दु.घ. ०२<br>खुला ०६<br>**एकूण १७** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) शासनमान्य संस्थेकडील रुग्णवैद्यकीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्य.<br>३) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी संस्थेच्या हॉस्पीटलकडील दवाखाना आया या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.०३/१०/२०२४ |
| ६ | **पोस्टमार्टम अटेंडन्ट**<br>अनु.जाती ०१<br>विजा-अ ०१<br>खुला ०२<br>**एकूण ०४** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) पोस्ट मार्टेम कामाचा एक वर्षाचा अनुभव.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि. ०४/१०/२०२४ |
| ७ | **मॉच्युरी अटेंडन्ट**<br>अनु.जाती ०१<br>विजा-अ ०१<br>खुला ०२<br>**एकूण ०४** | १) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (S.S.C.)<br>२) पोस्ट मार्टेम कामाचा १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २०,०००/- | दि.०४/१०/२०२४ |

वयोमर्यादा:- शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारासाठी ४३ वर्षे राहील.

ठामपा/पिआरओ/आस्था/ ५४८/ २०२४-२५ — **सही/-**
दि:२०.०९.२०२४ — अतिरिक्त आयुक्त - २
**pls visit our official web-site** — ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**
टिप :- सदरची जाहिरात ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.thanecity.gov.in प्रसिध्द करण्यात आलेली आहे.


# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## अति ताणाचे बळी

सध्याचे जग धावपळीचे झाले आहे. चार पैसे कमावण्याच्या नादात किंवा काम कमी कालावधीत जास्त काम केल्यामुळे अनेक कंपन्यांमधील कर्मचारी विमनस्क अवस्थेत जगत असतात. जगभरात अनेक कंपन्यांमध्ये यंत्रवत काम सुरू असते. त्यामुळे जीवनशैली बदलून स्वास्थ मिळत नाही. तसेच संगणकावर १६- १८ तास काम केल्यामुळे माणूस जिवंत असताना मृतवतपणे काम करीत आहे. या सर्व गोष्टींचा प्रतिकूल परिणाम शरीर व मनावर होतो. या परिस्थितीमुळे व कामाच्या अति ताणामुळे जगभरात अनेकांचे बळी जातात. असाच एक प्रकार पुण्यातील अन्र्स्ट अँड यंग (ईवाय) या बहुराष्ट्रीय कंपनीत घडला आहे. तो नक्कीच धक्कादायक आहे. या कंपनीत काम करणाऱ्या तरुण सनदी लेखाकार (सीए) तरुणीचा कामाच्या अतिताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे तरुणीच्या अंत्यसंस्काराला तिच्या कार्यालयातील एकही कर्मचारी हजर नव्हता. याचे कारण म्हणजे कर्मचाऱ्यांमध्ये नोकरी जाईल ही भीती होती किंवा अंत्यसंस्काराला कोणी जायचे नाही, अशी कंपनीच्या वरिष्ठांची सक्त ताकीद असावी, असे वाटते. यावरून तरुणीच्या आईने संताप व्यक्त केला होता. यावर कंपनीचे अध्यक्ष राजीव मेमानी यांनी लिंक्डइनवरून एक पोस्ट करत मृत पावलेल्या तरुणीच्या कुटुंबाची माफी मागितली आहे. रोजगार टिकवून ठेवण्यासाठी कर्मचारी कंपनी व्यवस्थापनाच्या हाताचे बाहुले कसे बनले आहेत, हे या प्रकारातून दिसून येते. अति ताणामुळे एखाद्या कर्मचाऱ्याचा जीव जावा ही दुर्दैवी घटना आहे. या प्रकरणी केंद्रीय कामगार मंत्रालयाने चौकशी सुरू केली आहे. तर, येरवडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. माजी केंद्रीय माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी समाज माध्यमावर एक पोस्ट करत त्यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. तसेच चंद्रशेखर यांनी या प्रकरणी केंद्रीय कामगार मंत्रालयाला चौकशी करण्याचे आवाहन केले होते. याला प्रतिसाद देत केंद्रीय कामगार राज्यमंत्री करंदलाजे यांनी चौकशी करण्याचे जाहीर केले. या प्रकरणी न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. चौकशी होईल, परंतु या प्रकरणी जबाबदार कुणाला धरणार ? पूर्वीच्या कामगार कायद्यांची धार कंत्राटी पद्धतीच्या नव्या कायद्याने बोथट झाली आहे. पुण्यातील ईवाय (अन्र्स्ट एड यंग) या कंपनीतील २६ वर्षीय सनदी लेखापाल तरुणी ना सॅबेस्टियन पेरायिलचा मृत्यू झाल्यानंतर आता अनेकजण कामाच्या ठिकाणी असणाऱ्या तणावाबाबत बोलू लागले आहेत. भारत पे कंपनीचे सहसंस्थापक आणि शार्क टँक या कार्यक्रमामुळे लोकप्रिय झालेले अशनीर ग्रोवर यांनीही या कंपनीतील त्यांचा कटू अनुभव कथन केला आहे. कामाच्या अतिताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा मृत तरुणीच्या आईने केल्यानंतर केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने देशभरात असुरक्षित आणि शोषणयुक्त कामाच्या वातावरणाची चौकशी करण्याचे संकेत दिले आहेत. यानंतर अनेकांनी कामाच्या ठिकाणी असणाऱ्या तणावाबाबत आपापली मते व्यक्त केली आहेत. अशनीर ग्रोवर यांचा एक जुना व्हिडीओ पुन्हा व्हायरल होत आहे. प्रसिद्ध उद्योगपती हर्ष गोयंका यांनी हा व्हिडीओ शेअर केला आहे. ग्रोवर यांनी याच कंपनीतील कामाचा अनुभव कथन करताना एका मुलाखतीत म्हटले आहे की, पहिल्या दिवशी जेव्हा कार्यालयात गेलो, त्यानंतर जे दिसले, ते पाहून धक्का बसला. मग मी छातीत दुखायला लागलो असे सांगितले आणि तिथून पळ काढला. तिथे अक्षरशः मरणासन्न अवस्थेत आलेले कर्मचारी पाहून मला वाईट वाटले. असे वाटत होते की, तिथे मृतदेह पडले आहेत आणि त्यांचे फक्त अंत्यसंस्कार करायचे बाकी राहिलेत. ग्रोवर यांनी सध्या बड्या कंपन्यांत सुरू असलेले भयाण वास्तव चित्रण रेखाटले आहे असे वाटते. ईवाय (अन्र्स्ट एड यंग) या कंपनीच्या पुण्यातील कार्यालयात कार्यरत ना सॅबेस्टियनचा २० जुलै रोजी मृत्यू झाला होता. कामाच्या अतिताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा तिच्या आईने केल्यानंतर कंपनीतील असुरक्षित व तणावाखाली असलेल्या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त होऊ लागली आहे. अशनीर ग्रोवर यांनी म्हटले होते की, मला एक कोटी पगार आणि भागीदारी मिळाली होती. परंतु तिथे काम करण्याची त्यांना इच्छा नव्हती. अशनीर ग्रोवर यांनी बोलण्याच्या ओघात टॉक्सिक कल्चरचा मुद्दा मांडला आहे. परंतु यावर लोकांच्या उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. ग्रोवर यांनी म्हटले होते की, जिथे भांडणे होतात , ते ठिकाण काम करण्यासाठी चांगले असते. काहीजण या वातावरणाला टॉक्सिक कल्चर म्हणतात. पण काम तर तिथेच होते, बाकी नॉन टॉक्सिक कल्चरचे खूप कार्यालय बघायला मिळतात. टॉक्सिक कल्चर याचा अर्थ मराठी भाषेत विषारी संस्कृती असा होतो. म्हणजे कामाच्या ठिकाणी वाद, भांडणे आणि स्पर्धा निर्माण करायची. तेथील वातावरण कृत्रिमरीत्या क्रियाशील करायचे आणि कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम कमी वेळेत करून घ्यायचे. हीच पद्धत जगभरातील अनेक बड्या कंपन्यांत सुरू झाली आहे. परंतु अशी विषारी संस्कृती रूढ करून भौतिकदृष्ट्या कंपनीचा फायदा होत असला तरी कर्मचाऱ्यांच्या आयुष्याशी कंपनी व्यवस्थापन खेळत असते हे निषेधार्ह आहे. मानवीय मूल्यांच्या वा नैतिक मूल्यांच्या दृष्टीने ते योग्य नाही असे वाटते. ईवायच्या पुणे कार्यालयातील नाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे समजते. सोशल मीडियावर ही बाब पसरल्यानंतर कंपनीवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी कंपनी व्यवस्थापना विरोधात कोणतीही कायदेशीर पावले उचलली जाणार नसल्याचे नाच्या वडिलांनी स्पष्ट केले आहे. मात्र, याप्रकरणी योग्य ती चौकशी केली जाईल, असे आश्वासन केंद्रीय कामगार व रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी दिले आहे. ना या वर्षी फेब्रुवारीमध्ये सीए परीक्षा पास झाली होती आणि मार्चमध्ये या कंपनीमध्ये रुजू झाली होती. तिला कामाचा प्रचंड ताण होता, असा तिच्या वडिलांनी आरोप केला आहे. तिच्या कामाच्या वेळापत्रकामुळे तिला क्वचितच झोप मिळत असे. तिला योग्य आहारही घेता येत नव्हता. नाच्या आईने ईवाय कंपनीच्या चेअरमनला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, आमची मुलगी गेली तरी असा प्रकार इतर कोणत्याही व्यक्तीसोबत होऊ नये. परंतु कंपन्यांच्या बदलत्या कामाच्या पद्धतीमुळे, कर्मचाऱ्यांना अति ताण येतो, हे नाकारता येत नाही. साहजिकच अति ताणाच्या कामामुळे बळी पडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता भवितव्यात नाकारता येत नाही हे गंभीर वास्तव आहे.


Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/13077/18/24
Inquiry/case No. : ACC/I/913/2024
Name of the Trust : जोस मान्चेरील मेमोरियल ट्रस्ट
**Address of the Trust : आरएच नं. आर-२०१, सेक्टर -४, ऐरोली, नवी मुंबई, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : स्टेला जय मंचेरिल**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 05/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/13594/18/24
Inquiry/case No. : ACC/I/993/2024
Name of the Trust : श्री महेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust : बील्डींग नं. ०९, फ्लॅट नं. १०७, तुलशीधम, एम. एम. आर. डी. ए. प्लॉट, धर्मवीर नगर, ठाणे (डल्यु), ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : महेश सुबेदार सिंह**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 500.00 |

**Value of Movable Property :** Rs. 500/- Only
(In Words Rs. Five Hundred Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 16/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

■ पद क्र. असिस्टंट डायरेक्टर, असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर, परवाना इंजिन ड्रायव्हर, ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर, ड्रेज कंट्रोल ऑपरेटर, स्टोअर कीपर, मास्टर 2nd क्लास, स्टाफ कार ड्रायव्हर, मास्टर ३ीव क्लास, मल्टी टास्किंग स्टाफ टेक्निकल असिस्टंट (
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICW-/Inter C-.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
■ Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/PWD:200/-
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://iwai.nic.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

# अष्टपैलू स्वाभिमानी व्यक्तिमत्व सुनील झळके : एक संघर्षमय प्रवास

समाजात वावरताना किंवा फिरताना आपल्याला अशा अनेक व्यक्तिमत्त्वांना जवळून पाहण्याचा योग आणि संधी मिळते .परंतु काही व्यक्तिमत्व हे आपणास त्यांचे रूप, स्वभाव , समाज व लोकांच्या प्रती त्यांची संवेदनशीलता, लोकसंग्रह, उत्तम गुण, सामाजिक प्रतिमा व त्यांच्या एकूण कारकीर्दीतील स्वाभिमानाने जीवन जगण्याची अजब कार्यपद्धती दिसत असते. या व्यक्ती नेहमी स्वतःचा व इतरांचा आदर करणारे विनम्र वृत्तीचे कोणत्याही प्रसंगात सकारात्मक व चैतन्यशील ठामपणे उभे राहणारे परोपकारी आणि त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्ती, गरजूंना कायम मदत करणारे व इतरांचे मनापासून उदारपणे कौतुक करणारी आहेत. कायम इतरांना चांगलं देण्याची वृत्ती ठेवणारे, केवळ पैशाच्या मागे न धावता कर्तव्य आणि जबाबदारीचे भान ठेवणारी त्यांच्या स्वभावातील खासियत आहे,असे व्यक्ती म्हणजे भिवंडी महानगरपालिकेतून नुकताच प्रभारी सहायक आयुक्त (शिक्षण) म्हणून सेवानिवृत्त झालेले सुनील झळके. त्यांना नुकताच नवी मुंबई येथील MCM² TV News व साई सागर इंटरटेनमेंट या संस्थेच्यावतीने शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्यांचा शोध घेणाऱ्या या संस्थेचे संपादक, जनार्दन शिंदे यांनी त्यांना ''स्टार महाराष्ट्राचे'' म्हणून नुकताच पुरस्कार जाहीर केलेला आहे, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह,पनवेल येथे पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये आज त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे, त्यानिमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व एक संघर्षमय प्रवासाचा थोडक्यात आढावा.

सुनील झळके यांची भिवंडी महानगरपालिकेमध्ये नियुक्ती होण्या पूर्वीपासूनची आमची गेली अनेक वर्षांची खास मैत्री. त्यांच्या महानगरपालिकेतील सेवेमध्ये व व्यक्तिगत जीवनातील संघर्षमय प्रवासाचा मी साक्षीदार. त्यामुळेच त्यांच्यासारखे एक अष्टपैलू व स्वाभिमानी, कायम वादळी व्यक्तिमत्व ठरलेल्या संघर्षमय प्रवासाचा वेध घेण्याचा उद्देशाने केलेला हा लेख प्रपंच.

तसं माझं आणि सुनील झळके यांचा संबंध गेल्या तीन पिढीपासूनचा आहे. आदिवासी, कोळी मल्हार या अत्यंत मागास व गरीब समाजामध्ये जन्मलेल्या व्यक्ती मजल दरमजल करीत ,अनेक प्रकारच्या अडचणीवर मात करीत आज एक यशस्वी आणि नोकरीमध्ये निष्कलंकपणे कर्तव्यपूर्ती पूर्ण करणं ही काही साधी बाब नाही. प्रत्येक स्तरावर त्यांनी कठोरपणे काम करणं आणि कामांची पूर्तता करणं म्हणजे कठीण आणि खडतर प्रवास करीत तारेवरची कसरत केलेली आहे. त्यांच्या या कार्यपद्धती आणि विविध जबाबदाऱ्या सांभाळताना मी त्यांचा संघर्षमय प्रवास जवळून पहात होतो, त्यामुळे त्याचाही मी प्रत्ययदर्शी आहे.१९९३ मध्ये त्यांनी फिटर या तांत्रिक पदावर महानगरपालिकेच्या कामात रुजू होऊन कामात सुरुवात केलेली होती. त्यांच्याकडे कायम अभ्यासू वृत्ती,खडतर आणि कठोर परिश्रम घेण्याची तयारी आणि त्यांच्या हुशारीमुळे त्यांनी लिपिक, जकात उपनिरीक्षक , परवाना निरीक्षक व कार्यालयीन अधीक्षक अशा पदांवर पदोन्नती मिळवत, विविध विभागांमध्ये विभाग प्रमुख म्हणून कोणाचाही मुलाहिजा न ठेवता कायद्याच्या चौकटीत राहूनच उत्तमपणे काम केले. त्यांच्या याच मेहनत,चिकाटी आणि अभ्यासूवृत्ती पाहून ,वरिष्ठांनी त्यांना प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, सहा वेळा माहिती व जनसंपर्क अधिकारी आणि सेवानिवृत्तीच्या वेळी प्रभारी सहाय्यक आयुक्त (शिक्षण) म्हणून अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी जबाबदाऱ्या दिल्या,त्या त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडल्या. हे करीत असताना त्यांनी भिवंडी महानगरपालिकेच्या नावाची प्रतिमा उंचावलेलीच आहे. कायम मनपाचा हित पाहून कायद्याचे तंतोतंत पालन करून ,कोणत्याही दबावाला बळी न पडता स्पष्टवक्तेपणा या त्यांच्या स्वाभिमानी स्वभावामुळे अनेक पदाधिकाऱ्यांच्या पचनी न पडल्याने राजकीय हेतू तसेच पूर्वग्रह दूषित मानसिकतेतून त्यांना अनेक वेळा अनेक बदल्यांना सामोरे जावं लागलं. त्यांच्या वेळोवेळी पदोन्नतीमध्येही अनेक पदाधिकारींनी खोडा घातला होता, परंतु त्यांनी कोणाकडेही मनधरणी केली नाही. त्यामुळे त्यांच्या बदल्या आणि स्वाभिमानामुळे जाणून-बुजून केल्या जाणाऱ्या बदनामी संदर्भात त्यांच्यावर स्वभावानुसार यतकिंचितही फरक पडला नाही.उलट नव्याने उमेदीने,हसतमुखाने प्रत्येक ठिकाणी कर्तव्य दक्षतेने कार्यभार सांभाळला, पण स्वाभिमान आणि कायदा कधीच सोडला नाही, मनावर उत्तम ताबा असल्याकारणाने त्यांनी संयमाने काम केलं,कायदेशीर कार्यपद्धतीत कुठलीही तडजोड केली नाही हे त्यांचे खास वैशिष्ट्य राहिले.

झळके यांना मराठी मातृभाषेचा प्रचंड अभिमान असल्याने ठाण्यातील दै.सन्मित्र चे संपादक व मराठी भाषा महर्षी स्व. स.पा.जोशी यांच्याबरोबर अनेकांसह मराठी राज्य चळवळीमध्ये सहभाग घेतला.त्याचबरोबर महाराष्ट्रातील वकिलांच्या बार असोसियेशनचे अध्यक्ष अडव्होकेट दातार यांच्यासह सर्वच मा.न्यायालयांमध्ये मराठीचा वापर व्हावा या दृष्टीने चळवळीत सहभाग घेत खारीचा उचलला. अशा अनेकांच्या सहभागामधून त्यांनी सध्या मा. न्यायालय मध्ये मराठी भाषेचा वापर व भाषेमध्ये दिले जाणारे निर्णय दिले जात आहेत,हे त्यांच्या प्रयत्नातून झालेली एक प्रमुख बाब आहे. तसेच सन २०२२ मध्ये डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाच्या, मराठी भाषा विभागातर्फे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मराठी भाषेतील स्पर्धे साठी महानगरपालिकेचे एक रुपयाही खर्च न करता, भिवंडी महानगरपालिकेत महाराष्ट्रामध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक व एक लाखाचे बक्षीस त्यांनी त्यांच्या अत्यंत परिश्रमातून मिळवून दिलेले आहे .त्यामुळे त्या वेळचे तत्कालीन आयुक्त विजयकुमार म्हसाळ व अन्य अधिकारी यांनी त्यांचे विशेष कौतुकही केलेले आहे.अशी विविध वाखाणण्याजोगी काम त्यांनी महानगरपालिकेच्यासेवेत असताना केलेली आहेत.

समाजामध्ये एखाद्या व्यक्तीकडे अनेक चांगले गुण असतात, ते सुनील झळके यांच्यामध्ये आहेत.त्यांनी नोकरी एके नोकरी न करता, नोकरी करत असतानाही अनेक वृत्तपत्रांमधून अनेक प्रकारचे अनेक क्षेत्रासाठीचे लेखन केले आहे. यामध्ये कविता, वृत्तपत्र लेखन, विविध वर्तमानपत्रांमध्ये विविध विषयांचे लेखन, मराठी मालिका व सिनेमा यांचे सीन मधील पॅचवर्क,संवाद आणि छोट्या मोठ्या भूमिका त्यांनी साकारलेल्या आहेत. त्यांनी एकांकिका लेखन करताना आजपर्यंत त्यांचे चार एकांकिका लिहून झालेल्या आहेत, त्यापैकी १९९३ मध्ये नाट्य दर्पण ,मुंबई या संस्थेने आयोजित केलेल्या श.ना.नवरे लिखित कथांवर आधारित,राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेमध्ये त्यांच्या ''शांताकुकडी (देख भाई देख )''या एकांकिकेस महाराष्ट्र राज्यावर पारितोषिक प्राप्त झालेला आहे आणि हे नाटक सध्याचा आघाडीचा अभिनेता प्रसाद ओक यांनी दिग्दर्शन करून अनेक एकांकिका स्पर्धांमध्ये त्याचे सादरीकरण केलेले आहे हे विशेष. त्यांनी मराठी सिनेमा, सिरीयल व वेसावकर आणि मंडळींचे कोळी व्हिडिओ अल्बम यांचे प्रसिद्धी प्रमुख व जनसंपर्क अधिकारी म्हणूनही काम पाहिलेले आहे. IBN डेंझारी १८ channel वरील crime time या मालिकेमध्येही त्यावेळचे वरिष्ठ आणि प्रसिद्ध पत्रकार , दिग्दर्शक स्व. गणेश बच्छाव यांनी पोलीसाची भूमिका प्रधान केल्यामुळे त्यांनी ती उत्तमपणे साकारलेली होती.

एवढंच नव्हे तर सामाजिक जाणीव ठेवून त्यांनी ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, आदिवासी, कोळी मल्हार सामाजिक संस्था ( महाराष्ट्र राज्य), आदिवासी सहकार मंच अशा विविध सामाजिक संस्थांचे ते संस्थापक सदस्य असून, आदिवासी लोकांना आर्थिक सहकार्य करण्याच्यादृष्टीने त्यांचा विकास साधण्यासाठी त्यांनी त्यांचे सहकारी आदिवासी सेवक- महादेव घाटाळ, अनंता पाटील, डॉ. अनंता पाटील, जयराम पाटील, दशरथ शेलार अशा अनेक चांगल्या मंडळींबरोबर ठाणे, पालघर आणि मुंबई जिल्ह्यांमध्ये दौरे करून आदिम आधार आदिवासी बिगर शेती सहकारी पतसंस्था स्थापन केली आणि सध्या ते या पतसंस्थेचे संस्थापक सदस्य व खजिनदार आहेत. समस्त आदिवासी वधू-वरांसाठी त्यांनी आपल्या या सहकाऱ्यांच्या सहकार्याने वधुवर सुचक मेळावे आणि त्यांचे लग्न लावण्याचे कार्यही सुरू केलेले आहे. सामाजिक ,शैक्षणिक कला , सहकार आणि लेखन क्षेत्रामध्ये लेखक, पत्रकार म्हणून कार्यरत असताना ते कायम अत्यंत उत्साह आणि प्रचंड कार्यक्षमतेने काम करताना दिसतात. एवढी एनर्जी त्यांच्यामध्ये आहे की, त्यांच्या सानिध्यात आलेल्यांना हे प्रकर्षाने जाणवल्याशिवाय राहत नाही. कामाचा व्याप आणि ताप पाहताना त्यांच्या चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा टेन्शनचे साधे लवलेशी दिसत नाही .सतत हसतमुख,दिलखुलास आणि एक अष्टपैलू व्यक्तिमत्व परंतु तितकेच कर्तव्यदक्ष आणि कर्तव्य कठोर, स्वाभिमानी अधिकारी म्हणून सुनील झळके यांचे नावलौकिक आहेत आणि मित्रमंडळींमध्ये परिचितही आहेत. निसर्ग नियम व शासनाचे नियम कोणीही मोडू शकत नसल्याकारणाने सेवानिवृत्ती ही त्यातूनच आलेली एक महत्त्वाची गोष्ट प्रत्येकाच्या वाट्याला येणार असते.परंतु आपण काय काम केलं, ते कोणत्या पद्धतीने केलं यालाही तितकंच महत्व असतं. त्यामुळे सुनील झळके यांनी त्यांच्याबद्दल झालेल्या वाईट प्रसंगातून आणि अनेकांच्या वाईट प्रवृत्तीमधूनही, वाईटातून कसं चांगलं निर्माण करायचं हे त्यांच्याकडून शिकण्यासारखा आहे. त्यांना यापूर्वी अनेक विविध संस्थांकडून पुरस्कार मिळालेले असून,विविध क्षेत्रातील मान्यवर व कलाकार यांचे सोबत त्यांचे चांगले व जवळचे संबंध आहेत.



सुनील झळके हे सेवानिवृत्त झाले असले तरी भविष्यामध्ये ते हरहुन्नरीआणि अष्टपैलू व्यक्तिमत्व जोपासणारे असल्याकारणाने भविष्यात ते त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक,सहकार आणि कलाक्षेत्रात नक्कीच तितक्याच एनर्जीने चांगलं काम करतील, ईश्वर त्यांना हे काम करण्याची प्रचंड प्रेरणा व एनर्जी प्रदान करो आणि त्यांच्या आयुष्यातील दुसऱ्या इनिंग मध्येही यशस्वी होण्यास करिता त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

सुनील झळके यांच्या स्वभाव व कायद्यानुसार केलेल्या कर्तव्याप्रमाणे आणि समाजामध्ये अनेक सामाजिक क्षेत्रात काम करीत असल्याची दखल घेऊन मुंबई स्थित MCM² TV News व साई सागर इंटरटेनमेंट यांच्यावतीने जाहीर झालेला ''स्टार महाराष्ट्राचे'' हा पुरस्कार त्यांना आज रोजी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील एका कार्यक्रमांमध्ये सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.त्यानिमित्तानेही त्यांच्या सर्व समाज हिताच्या कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा.

**लेखक- विवेक विष्णू मालसे,**
भिवंडी.
संपर्क -९८६०११७९६६.

# ‘स्वच्छता ही सेवा’ पंधरवड्यामध्ये नवी मुंबईत पथनाट्यांतून स्वच्छताविषयक प्रभावी जनजागृती



नवी मुंबई : 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा संपूर्ण देशभरात राबविण्यात येत असून या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छताविषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमांप्रमाणेच स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येत असून पथनाट्यासारख्या मनोरंजनातून प्रबोधनात्मक माध्यमाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. या पंधरवड्यामध्ये 'स्वभाव स्वच्छता,संस्कार स्वच्छता' अभियान राबविले जात असून त्या अनुषंगाने पथनाट्याच्या माध्यमातून वर्तनावर मिश्किल भाष्य करीत स्वच्छतेचा संस्कार रुजविण्यात आला.

या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून आरंभ क्रिएशन्स नाट्यसमूहाच्या वतीने आठही विभाग कार्यालय क्षेत्रात वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छतेविषयी पथनाट्ये सादर करून हसत-खेळत प्रबोधन करण्यात आले. विशेषत्वाने रेल्वे स्टेशन्स, गणेशोत्सव मंडळे, मुख्य चौक, मार्केट, बस डेपो, मॉल अशा गर्दीच्या ठिकाणी या पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले. बेलापूर ते दिघा विभाग कार्यालय क्षेत्रात विविध १६ ठिकाणी झालेली ही पथनाट्ये बघण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी करून सादरीकरण करणाऱ्या कलावंतांचे कौतुक केले.

या माध्यमातून कचरा वर्गीकरण, कचऱ्याची घरातच किंवा सोसायटीच्या आवारात विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणी कचरा करणाऱ्या नागरिकांना त्यापासून जागरूकतेने रोखण्यासाठी 'टोक दो' अभियान, गणेशोत्सवात विसर्जनासाठी कृत्रिम तलावांचा वापर अशा विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली. सर्वच ठिकाणच्या पथनाट्यांना नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देत हा उपक्रम यशस्वी केला.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुरबाड येथे

# मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना मेळावा

ठाणे : राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना सन२०२४-२५ या आर्थिक वर्षापासून या शासन निर्णयानुसार शा.नि.क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३,दि.०९ जुलै २०२४ व शा.नि.क्र.कौविस-२०२४/प्र.क्र.११८/प्रशा-२, दि.०९ सप्टेंबर २०२४ सुरु झालेली आहे.

मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड येथे दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. तरी या मेळाव्याकरिता मुरबाड परिसरातील खाजगी आस्थापना येणार असून उमेदवार यांची मुलाखत घेणार आहेत. तरी या योजनेकरिता जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड चे प्राचार्य अनिरुध्द जव्हारकर यांनी केले आहे.

## योजनेकरीता उमेदवाराची पात्रता पुढीलप्रमाणे

१) उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे. २) उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वीपास/ आयटीआय/ पदविका/ पदवी/ पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत. ३) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा. ४) उमेदवाराची आधार नोंदणी असावी. ५) उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. ६) उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल. या विद्यावेतनाचे विवरण १. १२ वी पास- रु.६,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, २. आय.टी.आय/ पदविका- रु. ८,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, ३. पदवीधर / पदव्युत्तर- रु. १०,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, अशा प्रकारे आहे.

या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS/MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत, असे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड चे प्राचार्य अनिरुध्द जव्हारकर यांनी कळविले आहे.

## सीबीडी पोलीस ठाण्यात अभ्यासिका

नवी मुंबई : कुठल्याही पोलीस ठाण्यात गेल्यावर त्या पोलीस ठाण्याचे बहुतांश आवार हे गुन्ह्यातील जप्त वाहने, अपघाती वाहने आणि संशयित वाहनांनी भरून गेलेले असते. मात्र नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अशा वाहनांसाठी वेगळी जागा करण्यात आली आहे. त्यामुळे आता पोलीस ठाणे आवार सुटसुटीत झाले आहेत. या जागेचा कल्पक उपयोग सीबीडी पोलीस ठाण्याने केला असून काही महिन्यांपूर्वी बॅडमिंटन कोर्ट उभे केले. तर आता पोलिसांसाठी अभ्यासिका निर्माण करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पार पडले. नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनी गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल व वाहने हे आयुक्त स्तरावर केंद्रित केल्यानंतर नवी मुंबई आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यामधील बरीच जागा रिकामी झाली. तसेच मुद्देमाल ठेवलेल्या काही खोल्याही रिकाम्या झाल्या होत्या. सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी सदर जागेचा उपयोग आपले सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बॅडमिंटन कोर्ट, ओपन जिम असे उपक्रम सुरू करण्यासाठई केला होता.. त्यानंतर त्यांनी मुद्देमाल ठेवलेल्या खोलीचे रूपांतर पोलीस कर्मचारी व पाल्य यांच्याकरिता अतिशय उत्कृष्ट अशा अभ्यासिकेमध्ये केले आहे. सदर अभ्यासिकेमध्ये स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास, कायद्याच्या पुस्तकांसह आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या अशी एकूण ३०० ते ३५० पुस्तके ठेवण्यात आली आहेत.

# ग्रामपंचायती अंतर्गत नल जल मित्रांची होणार नियुक्ती

भिवंडी : जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी/ प्लंबर, मेकॅनिक/ फिटर व इलेक्ट्रिशियन/पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नल जल मित्र यांची नेमणूक करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जल जीवन मिशन अतुल पारसकर यांनी केल आहे.

**इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा : मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

याबाबत जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य पद्धतीने व्हावी. या उद्देशाने प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत तीन नल जल मित्र यांची निवड करण्यात येणार आहे. तीन पदांसाठी प्रत्येक पदासाठी तीन याप्रमाणे ९ उमेदवारांची नामनिर्देशने राज्यस्तरावर करण्यासाठी ग्रामपंचायती अंतर्गत माहिती पद्वारे भरायची आहे. ग्रामपंचायतींमार्फत सादर केलेल्या नामनिर्देशनामधून राज्यस्तरावरून उमेदवारांची निवड करण्यात येणार असून निवड झालेल्या नल जल मित्र याना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कौशल्य संच: १.प्लंबर/गवंडी ,२.मोटर मेकनिक/फिटर, ३.इलेक्ट्रिशियन/पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी गावातील अनुभव असलेल्या व उचित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. कौशल्य असलेल्या उमेदवारास गावातच रोजगार उपलब्ध होणार आहे.

पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती व शाश्वततेसाठी ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता पात्र उमेदवारांनी ग्रामपंचायत सोबत संपर्क साधावा.-मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

शाश्वत पर्यावरणपूरक विकासाकडे लक्ष देत

# अभियंत्यांनी अद्ययावत रहावे : आयुक्त डॉ. शिंदे

## नवी मुंबई महानगरपालिकेत अभियंता दिन उत्साहात साजरा

नवी मुंबई : भारतरत्न एम. विश्वेश्वरय्या यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून प्रत्येकाने नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे व त्याचा आपल्या कामात वापर केला पाहिजे आणि याचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे असे सांगत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करुन शाश्वत भविष्यासाठी पर्यावरणाचे भान राखून काम केले पाहिजे असे अभियंता दिनी आयोजित विशेष कार्यक्रमात सांगितले.



*नवी मुंबई महानगरपालिका अभियांत्रिकी विभागाच्या वतीने नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित 'अभियंता दिन' कार्यक्रमाप्रसंगी आयुक्तांनी उपस्थितांशी संवाद साधला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, अभियंते असलेले उदयोजक व लेखक व्याख्याते प्रफुल्ल वानखेडे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच इतर विभागप्रमुख, अधिकारी व अभियंते मोठया संख्येने उपस्थित होते.*

### देशाच्या विकासात सर्वाधिक योगदान हे अभियांत्रिकी शाखेचे

देशाच्या विकासात सर्वाधिक योगदान हे अभियांत्रिकी शाखेचे असून नवी मुंबईच्या आजवरच्या प्रगतीतही अभियंत्यांची भूमिका महत्वाची राहिली आहे असे मत व्यक्त करीत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यापुढील काळात तंत्रज्ञानातील बदल लक्षात घेत प्रत्येकाने स्वत:ला अदययावत ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. नियोजन, अंमलबजावणी व देखभाल या गोष्टींकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत आयुक्तांनी शहरातील नागरिकांना आनंददायी वातावरण उपलब्ध करुन देण्याच्या जबाबदारीने काम करायला हवे असे म्हटले. महानगरपालिकेचे अभियंते म्हणून लोकसेवेची एक चांगली संधी उपलब्ध झाली असून तिचा पूर्ण क्षमतेने वापर करायला हवा असे ते म्हणाले.यापुढील वर्षापासून अभियंता दिनी वर्षभरात चांगली कामगिरी करणाऱ्या अभियंत्यांचा सन्मान केला जावा व त्यासाठी निकष तयार करुन त्यानुसार निवड करावी असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

### जो सर्जनशील असतो तोच अभियंता : वानखेडे

यावेळी सुप्रसिध्द लेखक व ऊर्जा क्षेत्रातील नामांकित उदयोजक प्रफुल्ल वानखेडे यांनी 'शहर विकासातील अभियंत्यांचे योगदान' या विषयावर अभ्यासपूर्णरित्या नर्मविनोदी शैलीत दिलखुलास संवाद साधला. स्वत: इलेक्ट्रिकल इंजिनिअर असल्याने आपल्या शैक्षणिक जीवनातील अनुभव खुसखुशीतपणे सांगत 'जो सर्जनशील असतो तोच अभियंता असतो' असे विविध उदाहरणे देत सांगून त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. जेव्हा नाविन्यपूर्णता अंगिकारण्याची व वापरण्याची सुरुवात होते तिथूनच इंजिनिअर म्हणून खरा प्रवास सुरु होतो असे ते म्हणाले. माणसांसारखे शहरांचेही स्वभाव असतात असे सांगत त्यांनी अस्सल नवी मुंबईकर असल्याचा अभिमान व्यक्त केला. जागतिक स्तरावरील विदयमान स्थितीची उदाहरणे देत प्रफुल्ल वानखेडे यांनी आज वाढत्या नागरिकीकरणात आपल्यापुढे असलेली आव्हाने सांगितली. नागरिकीकरणाचे सिमेंट, स्टिल, अमोनिया व प्लास्टिक हे चार स्तंभ असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक स्तंभाचे महत्व उलगडून सांगितले.

# माझी मिळकत माझी आकारणी या सेवेमुळे कर आकारणी होणार सुलभ

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना स्वत:च्या मिळकतीच्या बदलाची किंवा वापरातील बदलाची नोंद तसेच कर आकारणी न झालेल्या मिळकतीची कर आकारणी घरबसल्या जलद व सहजपणे करण्याची सुविधा माझी मिळकत माझी आकारणी या योजनेतून उपलब्ध केली आहे. यामुळे, नागरीकांच्या वेळेची बचत होणार आहे.

### चला तर मग जाणुन घेऊया कशी आहे माझी मिळकत माझी आकारणीच्या ऑनलाईन प्रक्रियेची संक्षिप्त माहिती

- पायरी १ : महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर भेट देवून, नागरीकांनी लॉगिन तयार करावे. त्यानंतर, संकेतस्थळावरील Citizen Services हा पर्याय निवडून Property Tax यामधील Self Assessment (स्व-मूल्यांकन) या सुविधेवर क्लिक करावे. त्यामध्ये, Self Assesment Form ओपन झाल्यानंतर नागरीकांनी नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सोबत ठेवावी.
- पायरी २ : त्यानंतर Property Information यामध्ये Property थरीवमध्ये आपली मिळकत महापालिकेच्या ज्या प्रभागात मोडत आहे तो प्रभाग नमुद करावा. Property Zone मध्ये आपली मिळकत महापालिकेच्या ज्या प्रभागात मोडत आहे तो नेपश नमुद करावा. (प्रभाग / झोन निहाय परिसराची यादी कडोंमपा संकेतस्थळावरील Recent Announcement मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे)Road Type मध्ये दिलेले पर्याय निवडावे. Billing Method यामध्ये Whole किंवा Individual हा पर्याय निवडावा. First Assessment Date मध्ये मिळकतीची प्रथम मुल्यांकन तारीख नमुद करावी. Construction Permission No/Date,Construction Completion no/Date ची माहिती उपलब्ध असल्यास ती नमुद करावी. Property Type यामध्ये जमिन किंवा इमारतीचा पर्याय निवडावा.
- पायरी ३ : Property holder Details मध्ये Single अथवा Joint पर्याय निवडावा. तसेच Property Address Details मध्ये Property Location -ddress यामध्ये मिळकतीचा संपूर्ण पत्ता नमुद करावा. Village मध्ये गावाचे/शहराचे नाव नमूद करावे. Servey No/City Servey No मधील माहिती भरावी.
- पायरी ४ : Floor Details मध्ये Flat No, Floor No, Occupancy Type, Occupier Name , Legal/illegal, Construction Type, Usage Type, Usage subtype, Room यावर क्लिक करुन विचारणा केलेली माहिती भरुन झीलशशव करावे.
- पायरी ५ : Document Uplod मध्ये विचारणा केलेले कागदपत्रे Upload करुन, Submit Assessment करावे. ही प्रकिया पुर्ण झाल्यानंतर Application Number उपलब्ध होईल.
- माझी मिळकत माझी आकारणी या उपक्रमातून मालमत्ता धारकांना स्वत: मालमत्तेची ऑनलाईन नोंदणी करता येणार असल्याने, नागरीकांनी याचा लाभ घ्यावा व कल्याण डोंबिवली महानगरपालिका शहराच्या विकासास हातभार लावावा असे आवाहन कर निर्धारण व संकलन विभागामार्फत करण्यात येत आहे.

**काँग्रेस आ.सुनील केदार यांच्या वक्तव्याचा निषेध**
**मुख्यमंत्री शिंदेंच्या लाडक्या बहिणी**
**आ. सुनील केदार यांच्या विरोधात आक्रमक**

# शिवसेनेच्या मानसीताई दळवी यांच्या नेतृत्वाखाली निषेध मोर्चा







पेण : काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांनी काँग्रेस सत्तेत आल्यावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद करणार असे जाहीर वक्तव्य केल्याने या वक्तव्याच्या निषेधार्थ गुरुवारी सकाळी शिवसेना पक्षातर्फे शिवसेनेच्या नेत्या मानसीताई दळवी यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग बस स्थानका जवळ निषेध मोर्चा काढून काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांच्या वक्तव्याचा निषेध करून बॅनर वरील त्यांच्या फोटोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या बहिणींनी चपलेने झोडून निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी शिवसेना नेत्या मानसीताई दळवी, जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, संजीवनी नाईक तालुका प्रमुख अनंत गोंधळी, जिवन पाटील, दिनेश मिनमिने, हृदयनाथ पाटील तसेच जिल्ह्यातील शिवसेच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरटीओ कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर

## आरटीओ कार्यालयाशी संबंधित कामे रखडणार असल्याने वाहन मालक अस्वस्थ

कल्याण : अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे ६६ वर्ष नेतृत्व करणाऱ्या मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून (ता.२४) बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

### वाहन मालक अस्वस्थ

वाहनांशी संबंधित कामे आरटीओ कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालक अस्वस्थ आहेत. शिकाऊ वाहन प्रशिक्षणार्थी पदाची परीक्षा रद्द होण्या बरोबर वाहनांशी संबंधित सर्व कामे कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालकांची आरटीओ कार्यालयात कामे उरकून घेण्यासाठी शुक्रवारी झुंबड उडाली आहे.

आरटीओ कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या मागण्या प्रलंबित आहेत. नवीन प्रशासकीय बदलामुळे कामकाज करताना कर्मचारी त्रस्त आहेत. अशा अनेक मागण्यांकडे शासन लक्ष देत नसल्याने या महत्वपूर्ण विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आरटीओ कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर जाणार आहेत.
**-सुरेंद्र सरतापे** सरचिटणीस, मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना.

बेमुदत संपावर जाण्याची नोटीस परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांना मोटार वाहन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, पवबा कणखर, दीपक गांगुर्डे यांनी दिली. परिवहन आयुक्तांनी तातडीने सहकारी अधिकाऱ्यांसह कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर गुरूवारी चर्चा केली. या चर्चेत नेहमीप्रमाणे कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींना कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या प्रलंबित मागण्यांवर अधिकाऱ्यांनी पोकळ आश्वासने दिली. बेमुदत संप मागे घेण्याची गळ घातली. लिखित स्वरुपात आश्वासनांची पूर्तता करण्यास अधिकारी असमर्थ ठरले. त्यामुळे यापूर्वीप्रमाणेच परिवहन अधिकारी आपली बोळवण करत आहेत याची जाणीव झाल्याने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला.

### कर्मचाऱ्यांच्या मागण्या

*आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाबरोबर वाहन चालक, मालक हे ग्राहक सेवेचे काम करावे लागते. यामुळे प्रशासकीय कामात गुंतागुंत निर्माण झाली आहे. या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त आहेत. महसुली विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्यात आले नाही. विभागीय परीक्षांमध्ये अनावश्यक बदल करण्यात आले आहेत. आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कळसकर समितीच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे, बदल्या, बढत्यांमध्ये सेवा ज्येष्ठतेचा विचार न करणे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. मोटार वाहन कर्मचारी संघटनेने वेळोवेळी या मागण्यांविषयी शासनाकडे दाद मागितली आहे. त्याची दखल शासनाने घेतली नाही. केवळ तोंडदेखली आश्वासने देऊन कर्मचाऱ्यांची वेळोवेळी बोळवण करण्यात आली. त्यामुळे यावेळी लेखी स्वरुपात मागण्या मान्य झाल्याचे पत्र परिवहन विभागाकडून दिले जात नाही, तोपर्यंत बेमुदत बंद मागे घेतला जाणार नाही, असे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी सांगितले.*

मोदी आणि रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त

# पनवेलमध्ये रक्तदान शिबीर



पनवेल : लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दूरदृष्टीतून लोककल्याणकारी विविध योजना अंमलात आणून देशाला प्रगतीपथावर आणले. त्याचबरोबर देशाच्या हिताचे योग्य निर्णय घेऊन देशाला बलशाली बनवले आहे, त्यामुळे आपला भारत देश जगात सामर्थ्यवान देश म्हणून उदयास आला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज येथे केले. तसेच कोकणात भाजपला मजबूत करण्याचे काम करणारे नामदार रविंद्र चव्हाण हे ताकद देणारे नेते आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्यावतीने विविध सेवाकार्य असलेल्या 'सेवा पंधरवडा'चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुका व शहर युवा मोर्चाच्यावतीने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजीत पाटील, दिनेश खानावकर, कोमल कोळी, एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. राजेश तरदे, डॉ. शारदा आंचन यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घ्या

## आयुक्त मंगेश चितळे यांचे आवाहन

पनवेल : मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा शासन निर्णय जारी करण्यात असून ६० वर्षांवरील नागरिकांना योजनेचा लाभ घेता येणार आहे. देशभरातील विविध तीर्थक्षेत्रांसाठी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना प्रती व्यक्ती प्रवास खर्चाची कमाल मर्यादा ३० हजार इतकी असणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने' ची घोषणा केली आहे.पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभघ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

*पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना असते. परंतू त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे पुरेशी माहिती नसल्याने यात्रा करता येत नाही. हेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी पालिका मुख्यालयातील समाजविकास विभाग कार्यालय येथे संपर्क साधावा अशी माहिती उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले आहे.*

### आवश्यक कागदपत्रे

- वैद्यकीय प्रमाणपत्र
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक
- सदर योजनेच्या अटी शर्तींचं पालन करण्याबाबतचं हमीपत्र

### 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करण्यासाठी आवश्यक पात्रता

- लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणं आवश्यक
- वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम २.५० लाखांपेक्षा जास्त नसावे.
- 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा लाभ घेण्यासाठी कागदपत्र आवश्यक कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागेल.
- लाभार्थ्याचे आधार कार्ड/ रेशनकार्ड
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र
- महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचं प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/ प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत असणं अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड
- अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुनं नसावं)
- जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले होते, परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही, अशा माजी अर्जदारांना देखील या योजनेत पात्र ठरवले जाणार नाही.
- जर असे आढळून आले की, अर्जदार/प्रवाशाने खोटी माहिती देऊन किंवा कोणतीही तथ्यं लपवून अर्ज केला आहे, ज्यामुळे तो/ती प्रवासासाठी अपात्र ठरते, तर त्याला/तिला कधीही योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवता येईल.



ठाणे, पालघर, ठाणे, नाशिक, रायगड हे जिल्हे शहरी व ग्रामीण भागामध्ये विभागलेले आहेत. मोठ्या प्रमाणात या जिल्ह्यात आदिवासी व आदिम कातकरी जमातीचे पिढ्यानपिढ्यांचे वास्तव्य आहे. त्यांचे अनेक मुलभूत हक्कांचे प्रश्न देशाच्या स्वातंत्र्याला ७७ वर्षानंतरही प्रलंबित आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी शेकडो आदिवासी बांधव बेमुदत निर्णायक आंदोलनाला बसले आहेत.

# रोटरी क्लब ऑफ ठाणे प्रीमियम व ठाणे लेक सिटीतर्फे राष्ट्रीय हिंदी दिवस संपन्न

ठाणे : रोटरी क्लब ऑफ ठाणे प्रीमियम व ठाणे लेक सिटी च्या सहकार्याने राष्ट्रीय हिंदी दिवस काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात संपन्न झाला. कालिदास लिखीत शाकुंतलम नाटकातील एका अंकाचे प्रख्यात लेखक पद्मश्री शरद जोशी यानी लिहीलेल्या विनोदी नाट्य अंकाचे यावेळी वाचन करण्यात आले. शरद जोशी यांची कन्या रिचा यावेळी रोटरीच्या वतीने गव्हर्नर दिनेश मेहता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी, रोटरी क्लब ऑफ ठाणे प्रिमीयमच्या अध्यक्षा डॉ. सोनल बांगडे, रोटरी क्लब ऑफ लेकसिटीचे अध्यक्ष जगदीश चेलारामानी व्यासपीठावर उपस्थित होते. दोन्ही रोटरी क्लबतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला रसिकानी भरभरून प्रतिसाद दिला. लेखिका दिग्दर्शक प्रीता माथुर ठाकुर, अतुल माथुर, रमेश कुमार, अमन गुप्ता, दुर्गेश बक्शी, लता संजय यानी नाट्य प्रयोगाचे सादरीकरण केले.




रोटरी क्लबच्या वतीने दरवर्षी हिंदी दिवस साजरा केला जातो, त्याचाच भाग म्हणून या नाट्य अंकाचे सादरीकरण प्रेक्षकांसाठी करण्यात आले. हिंदी आपली राष्ट्रभाषा आहे, तिचा सन्मान आपण राखला पाहिजे, जेव्हा भाषेचा वापर दैनंदिन जीवनातून कमी व्हायला लागतो त्यावेळी आपण आपली संस्कृती, इतिहास विसरू लागतो, तेव्हा आपल्या भाषेचा अभिमान आपल्याला हवा असे मत रोटरीचे गव्हर्नर दिनेश मेहता यानी व्यक्त केले. सुरूवातीला प्रास्ताविक डॉ. सोनल बांगडे यानी केले तर, आभार जगदीश चेलारामानी यानी मानले. रोटरीच्या विविध उपक्रमांसाठी सहकार्य करणाऱ्या सहकारयांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771